Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# आदिवासी साहित्यातील आस्वादतेची दशा आणि दिशा

निळकंठ ल. बोरोडे

मराठी विभाग प्रमुख जे.डी.पा.सां.महा.दर्यापूर.

*सारांशः*

'आदिवासी' आणि 'आदिवासी साहित्य' हया दोनही शब्दांना एक आगळेवेगळे स्थान असून हया स्थानाने स्थाननिश्चिती केलेली असल्यामुळे हया स्थानाकडे वाचक, रसित समीक्षकांचे लक्ष वेधल्या जावून हया सर्व बाबींच्या चिकित्सा, अभ्यास तसेच शोधपर लिखाणांला महत्व येवून बरेच अभ्यासक हया बाबीवर अभ्यासपूर्ण लिखाण करत आहेत. आदिवासीच्या अदिम परंपरांनी युक्त साहित्य हे मधाच्या पोळयाप्रमाणे असून हया साहित्यातील रानमेवा शोधण्याने काम बरेच अभ्यासक करीत असून मी सुध्दा पुढील थोडा प्रयत्न करीत आहे.

प्रस्तावना -

### 1) आदिवासी कोण ?

भारतीय संस्कृती कोशात 'आदिवासी' विशयी पुढील माहिती दिली आहे. ''आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव – समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणा–या किंवा बाहेरच्या देशातून येउन वने व पर्वत हयांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्य जाती किंवा आदिवासी असे म्हणतात.'' [1]

आदि (आदिम, सर्वात अगोदर ) पासून ज्यांचा वास ( रहाणे ) आहे ते त्या भूभागातील आदिवासी अशी व्याख्या करता येईल.

### 2) आदिवासी जमाती

आदिवासी विकासाच्या दृश्टीने महाराश्ट्राचे प्रामुख्याने खालील गट पाडण्यात आलेले आहेत.[2]

;अ) सहयाद्री गटातील आदिवासी जमाती
1) महादेव कोळी 2) वारली 3) कोकणा 4) ठाकूर 5) कातकरी किंवा काथोडी 6) कोळी मल्हार 7) कोळी ढोर 8) दुबळा 9) धोंडीया

;ब) सातपुडा गटातील आदिवासी जमाती
1) भिल्ल 2) गामीट 3) कोरकू 4) धनका 5) पारधी 6) नायकडा 7) राठवा

क)गोंडवन गटातील आदिवासी
1) गोंड 2) आंध 3) कोलाम 4) परधान 5) हलबा–हलबी 6) कावर 7) धोटी–धोटया

हयाशिवाय इतरही काही जमातीचा आदिवासी म्हणून समावेश होउन

'अनुसूचित जमातीच्या यादीत 'आज सत्तेचाळीस जमाती आढळतात. आदिवासीचं 'हिंदुकरण', 'खिस्तीकरण', 'इस्लामीकरण' भूतकाळात झाले तर आज हिंदुत्वाच्या नावाखाली वनवासीकरण सुरु आहे.

### 3) आदिवासी साहित्य : प्रकार, भेद :–

आदिवासी आदिवासी साहित्याची व्याख्या देताना डॉ. विनायक तुमराम लिहितात – ''आदिवासी साहित्य हे व्यापक स्वरुपाचे साहित्य आहे. मग ते कोरकू जमातीवरील असो वा गोंड, भिल्ल, परधान, कोलाम, आंध, महादेव कोळी, वारली हया जमातीवरील साहित्य असो किंवा आणखी इतर कोणत्याही जमातीवरील साहित्य असो, त्या सर्वांचा समावेश आदिवासी साहित्यातच होईल '' [3]

आदिवासींच्या परीक्षेत्रामध्ये असलेल्या विषयावर आदिवासींनी किंवा इतरांनी लिहिलेल्या साहित्याला आदिवासी साहित्य असे म्हणता येईल.

Title : आदिवासी साहित्यातील आस्वादतेची दशा आणि दिशा
Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ] निळकंठ ल. बोरोडे yr:2013 vol:3 iss:2

***आदिवासी साहित्याचे प्रकार :–*** 1) लिखीत साहित्य (प्रकाशित) 2) अलिखीत साहित्य (अप्रकाशित)
***आदिवासी साहित्याचे प्रांतिक भेद :–*** 1) गोंडवाना विभाग 2) सातपुडा विभाग 3) सहयाद्री विभाग

***आदिवासी साहित्याचे कालिक भेद :–*** 1) उत्पत्ती ते रामायणकाळ
2) रामायण काळ ते महाभारत काळ 3) महाभारत ते इ.स.पर्यंत
4) इ.स. ते ज्ञानेश्वर 5) ज्ञानेश्वर ते 1947 6) 1947 ते आजपावेतो
आदिवासींचे साहित्य प्रामुख्याने लोकसाहित्य आहे. आदिवासींच्या लोकसाहित्याचे प्रकार डॉ. सौ. शैलेजा देवगांवकर यांनी पुढीलप्रमाणे केलेले आहेत. [4]




(पुरुष आणि स्त्रियांचा समूह नाचतो )

कविता, कादंबरी, नाटक हा वाड.मय प्रकार आदिवासी साहित्यात पहावयास सापडते. 'गोंडवन पेटले आहे. ' विनायक तुमराम, ' हाकुमी, ' एनकाउंटर' तसेच इतरही काही कादंब–या, विनोद मोरांडेचे 'आत्मसमर्णण'हे नाटक आहे.

***4) आदिवासी साहित्य : प्रेरणा आणि भूमिका :–***

आदिवासी साहित्याची प्रेरणा आदिवास आहे. हे आदिवासी, आदिमानव असून हया भूमीतील आहेत. त्यांचे निसर्गाशी अतूट असे नाते आहे. हया नात्यातून स्फुतरतेने गाणं हे लोक गाण्याचा पवित्रा घेत आदिवासी साहित्य म्हणून समोर आले आहे. आदिवासी साहित्याची प्रेरणा आणि भूमिका स्वतंत्र व आगळी वेगळी आहे. हया साहित्याचे लिखाण त्यांना जसे अनुभव आले तसे त्यांनी साहित्यात मांडले आहेत. हे अनुभव दुःखाचे, आनंदाचे, प्रेमाचे समस्याप्रधान इत्यादी विविध स्वरुपाचे आहेत. लोकसाहित्य – आदिवासी लोकसाहित्य असा ढोबळमानाने हयांचा साहित्याचा प्रवास आहे. आदिवासी साहित्याची पुढीलप्रमाणे वैशिष्टये सांगता येतील.

1) परंपरा 2) आस्वाद्यता 3) खरेपणा 4) उत्कृष्टता 5) अनामिक कर्ता. प्राचीन आणि अलिखित आदिवासी साहित्याचा कर्ता प्रामुख्याने अनामिक असतो. पण आधुनिक आदिवासी साहित्य हे लिखीत स्वरुपाचे असून त्याचा कर्ताही माहित असतो. हया साहित्याच्या प्रेरणा
1) नैसर्गिक 2) सांस्कृतिक 3) आदिवास 4) निसर्ग 5) ऐतिहासिक 6) वैज्ञानिक प्रेरणा घेवून साहित्य लिहिल्या जात आहे.

***5) ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्य :–***

ग्रामीण साहित्याचा संबंध आर्थिकेशी, दलित साहित्याचा संबंध स्पृश–अस्पृशतेची तर आदिवासी साहित्याचा संबंध आदिम जन जीवनाशी येतो. हया तिनही साहित्याचे मराठी साहित्यातील स्थान आगळे वेगळे स्वतंत्र असे आहे. वाचकांनी, समीक्षकांनी हया साहित्यप्रकाराकडे विकृत नजरेने पाहू नये व हया तिनही प्रकारामध्ये वतकमत जव उंकम असा प्रकार असू नये.

आदिवासी साहित्याचे स्वतंत्र भाषाशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र निर्माण व्हावे असा विचार प्रा. डॉ. विनायक तुमराम हयांनी मांडला आहे. मराठीमध्ये आदिवासी जीवनाची पहिली दखल घेतली ती महात्मा फुल्यांनी

'' गोंड भिल्ल क्षेत्री होते मूळधनी ।
इराणी मागूनी जाते आले येथे ।''

(समग्र वाड.मय पृ. क्र. 496)

'' शूर भिल्ल कोळी शराने तोडीले ।
हाकलून दिले रानीवनी ।''

(समग्र वाड.मय पृ. क्र. 457)

जल, जंगल व जमीन यांचे 'मूळधनी', येथील क्षेत्राधिपती आदिवासी होते.

### *6) आदिवासी साहित्यातील अस्मिता :–*

हया साहित्याचे जे वेगळेपण दिसते ते जपून ठेवण्याचा प्रयत्न आदिवासींनी केलेला आहे. रुढी, परंपरा, हयांनी बनलेली हयांची जी संस्कृती आहे हया संस्कृतीच्या अस्मितेचे जतन करायचा पुरेपुर प्रयत्न आदिवासींनी केलेला आहे. हया अस्मितेमुळेच आदिवासींचे साहित्य पूर्वापार काळापासून आजपावेतो टिकून आहे. ते त्यांच्या अस्मितेमुळेच, हया अस्मितेमुळेच आदिवासी संस्कृती ठळकपणे लक्षात येते. आदिवासीचा पेहरावच त्यांचे आगळेपण व अस्मिता स्पष्ट करतो. मराठी वाड.मयातील प्रवाह हे मान्य करुन हे साहित्य स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिध्द आहे. वसंत कुलसंगे आपल्या 'अन्याय' कवितेत लिहितात– ''मी वनवासी नाही, मी आदिवासी आहे, येथील राज्यकर्ती जमात, म्हणून इतिहास आहे.''

''चमार होशी, त नाडया जोती करुन मरशी, पन वारल्याच्या जल्माला जाशी त जंगलाचा राजा होशी ''

नारगोळकर : जगलचे राजे. पृ. 1

### *7) आदिवासी साहित्याची सामाजिकता :–*

साहित्य कोणतेही असो कोणत्याही कालखंडातील असो साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब पडल्याशिवाय राहत नाही. समाजातील चटका लावणा–या घटनांवर साहित्यनिर्मिती केल्या जाते. साहित्य हे समाजातील लोक नाचतात. त्यापासून प्रेरणा घेतात. साहित्याचा जन्म समाजातून होतो आणि समाजाला साहित्य घडविते.

समाज–साहित्य–समाज

समाज, साहित्यापासून स्फूर्ती घेते. साहित्य समाजामध्ये जन्म घेते व समाजामध्ये विसावते. साहित्य समाजाला घडविते की समाज साहित्याला घडवितो हा समाजाला वारंवार पडणारा प्रश्न आहे. साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबंब पडतेच.

### *8) आदिवासी साहित्य आणि जागतिकीकरण :–*

आदिवासी साहित्य आदिम काळापासून आजपावेतो विविध कालखंडात समोरे जावून आजही समर्थपणे उभे असलेले दिसत आहे. हयामध्ये आदिवासी आणि आदिवासी साहित्याचे श्रेष्ठतव, मोठेपण, अस्मिता दडलेली आहे. ज्या ज्या काळामध्ये अलौकिक गोष्टी निर्माण झाल्यात हया अलौकिक गोष्टी तसेच महत्वप्रधान गोश्टींची योग्य त्याठिकाणी हया साहित्याने दखल घेतलेली आहे. रामायण, महाभारत हया कालखंडातील कथा, कथापुरुषांचा आधार घेवून आदिवासींनी आपले साहित्य लिहिले आहे. आधुनिक कालखंडातील साहित्य लिखीत स्वरुपामध्ये स्वतःच्या सुख, दुःखाचा विचार असून हया साहित्यामध्ये जागतिकीकरण आणि हयांचा उल्लेख आलेला आहे.

### *9) आदिवासी लोककला :–*

आदिवासींच्या लोककला, लोकगीते, लोककथा, लोकनाटय नृत्याचा आधार घेवून प्रदर्शीत केल्या जात असल्यामुळे चिरस्मरणीय राहून मनास एकप्रकारचा आल्हाद देतात. हया लोककलांमधून प्रामुख्याने त्यांची संस्कृती उभी राहते. हया लोककलांचे प्रदर्शन सण, उत्सवांच्या वेळेला प्रामुख्याने दिसून येते.

### *10) आदिवासी साहित्य : शास्त्रीय अभ्यास एक दिशा :–*

गंगाराम जानु आवारी, व्यंकटेश आश्राम, डॉ. गोविंद गारे, विठठलसिंग धुर्वे, भुजंग मेश्राम, ल.सु. राजगडकर, महादेव गोपाल कडू, प्रभू राजगडकर, मोतीराम छतिराम कंगाली, डॉ. उत्तमराव घोंगडे, उत्तमराव सोनावणे, वाहरु सोनवणे, विनायक तुमराम, व्यंकटेश आत्राम, रवी कुलसंगे, पुरुषोत्तम शेडमाके, प्रा. वामन शेळमाके आदी साहित्यिकांनी साहित्यनिर्मिती केलेली आहे.

पहिले आदिवासी साहित्यसंमेलन10 व11नोव्हेंबर 1979 भद्रावती जि. चंद्रपूर,
दुसरे आदिवासी साहित्य संमेलन 23 व 24 मे 1982 वणी जि.यवतमाळ
तिसरे आदिवासी साहित्य संमेलन 6 व 7 जून 1987 किनवट जि. नांदेड
चौथे आदिवासी साहित्य संमेलन 27,28,29 जाने. 1989 नंदूरबार जि. धुळे
पाचवे आदिवासी साहित्य संमेलन 23,24,25 डिसें. 1990 पालघर जि. ठाणे
सहावे आदिवासी साहित्य संमेलन 4 व 5 डिसें. 1994 चिखलदारा जि.
अमरावती. ही साहित्य संमलने झालीत. [5]

विविध आदिवासी साहित्याचे संकलन, वर्गीकरण, निर्मिती ब–याच अभ्यासकांनी व साहित्यकारांनी केलेली आहे. एखाद्या साहित्यकृतीकडे समीक्षक विविध दृष्टीकोनातून पाहतो व त्या साहित्यकृतीमध्ये साहित्यिकाला काय सांगावयाचे आहे. हयाचा शोध विविध बाजूनी प्रकाश टाकून तो घेत असतो. त्याचप्रमाणे आदिवासी साहित्यातील छोटया छोटया भागावर प्रकाश टाकून त्या आदिवासी साहित्याचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा. म्हणजे तो आस्वाद्य विषय अधिक आस्वाद्य होईल. वर्ण्य विषय मध्यवर्ती ठेवून हया मध्यवर्ती भागाचा नंतरचा स्तर समीक्षकांचा व त्यानंतरचा स्तर वाचक, रसिक हयांचा राहील.




मूळ अंशा चा आकृतीत दाखविल्याप्रमाणे जर अभ्यास झाला तर वर्ण्य विषयाची रुची त्यातली माहिती वाचकांना विनासायास होईल. हयानंतर मूळ अंशावरील समीक्षकांचा भाग जर वाचकांच्या वाचनात आता वर्ण्य विषयाचा आस्वाद वाढून अशा अभ्यासास शास्त्रीयता येईल व ब–याचशा शास्त्रीय गोष्टींची माहिती होईल.

***संदर्भ***


1)संपा. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतीकोश, भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, प्रथम आवृत्ती खंड.1, 1962 पृ. 426

2)cheduled Tribes in Maharashtra ( Census of India 1961 ) Delhi 1972.P.3

3)विनायक तुमराम, 'आदिवासी साहित्य : उद्‌गम आणि व्याप्ती ', लोकमत ( रविवारची साहित्य जत्रा ) 5–12–1982, पृ. 4

4)डॉ. शैलजा देवगांवकर – महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, प्रथमावृत्ती 19 डिसेंबर 1993, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. 2

5)डॉ. विनायक तुमराम – आदिवासी साहित्य स्वरुप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 17–11–1994 पृ. 164 व 165

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net